

# श्री बाळूमामा आरती-जयदेव जयदेव जय बाळूमामा

https://www.chalisa.online

जयदेव जयदेव जय बाळूमामा |
आरती ओवाळू तुज कैवल्य धामा ||

धनगर कुलाचा उद्धार झाला |
अवतरले संत अकोळ गावाला |
बालपणी त्यानी चमत्कार केला |
वस्तीचे दर्शन भोजन थाळीला || १ ||

मेंढ्या राखिती उन्हातानात |
मुक्या प्राण्यावर अपार प्रीत |
नीतीने बागावे कमी नाही होत |
उन्मत्ताला मामा शासन करीत || २ ||

गोसावी रूपात देवदूत आले |
मामांचे त्यांनी सत्व पाहिले |
अवघड विहीरीचे पाणी पाजता |
आशीर्वाद देवी प्रसन्न होता || ३ ||

दीन दुबळ्यांना मामा राक्षिती |
निपुत्रिकाला मामा संतान देती |
कण्या रोगाल्या औषधी होती |
भंडा-याचा महिमा वर्णावा किती || ४ ||

पृथ्वीतलावर मामांची सत्ता |
देती वचन आपुल्या भक्ता |
आदमापूर क्षेत्री समाधी घेता |
स्वप्नी दर्शन भक्तांना देता || ५ ||

|| https://www.chalisa.online ||